Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्रराज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ, स.नं.८३२अे, फायनल प्लॉट नं.१७८,१७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयुटच्यामागे,भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे–४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

**तातडीचे/महत्वाचे/**
**कालमर्यादित/हस्तपोच**

क्र.रा.मं/पेन्शन–८/ह.दा/२०२५–२६/३९७६
पुणे– ४११ ००४
दिनांक :–३१/१०/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे,

विषय :– मंडळातुन सेवानिवृत्त झालेले सेवानिवृत्ती वेतनधारक तसेच कुटुंबनिवृत्ती वेतनधारक यांच्या हयातीच्या दाखल्याबाबत.

संदर्भ :–१. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:निवेयो–१००७/प्र.क्र.१२०/कोषाप्र.५/मुंबई ३२, दिनांक १८ ऑगस्ट, २००८

२. वित विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण–२०२१/प्र.क्र.९९/२१/कोषा–प्रशा–५/ मुंबई ३२, दिनांक २२ डिसेंबर,२०२१

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये सेवानिवृत्ती वेतनधारक तसेच कुटुंबनिवृत्ती वेतनधारकांना ते हयात असल्याबाबतचा दाखला वर्षातून एकदा म्हणजे प्रतिवर्षी नोव्हेंबर महिन्यात सादर करणे बंधनकारक आहे.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सन २०२५–२६ करीता हयातीच्या दाखल्या संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. सेवानिवृत्त व कुटुंबनिवृत्ती वेतनधारकांची सविस्तर माहिती असलेली विभागीय मंडळ निहाय, प्रत्येक बॅक व ब्रॅचनिहाय दोन याद्या मंडळाकडे उपलब्ध असलेल्या व मागील वर्षी घेण्यात आलेल्या प्रपत्रातील नमूद माहितीच्या आधारे तयार करण्यात आल्या असुन त्या या पत्रासोबत जोडल्या आहेत.

२. हयातीचे दाखले व परिशिष्ट अ व ब चे कोरे फॉर्म या पत्रासोबत देण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार सदर परिशिष्टांची व दाखल्याची झेरॉक्स काढुन बॅकेत देण्यात यावेत.

३. प्रत्येक सेवानिवृत्तीधारक/कुटुंबनिवृत्तीधारक यांची राज्य मंडळ कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहीती परिशिष्ट क मध्ये घेण्यात आलेली असुन ती सबंधितांकडून पडताळणी करून व त्यामध्ये काही दुरूस्त्या असतील तर ती दुरूस्ती करून स्वतंत्र विनंती अर्जासह योग्य त्या पुराव्यासह सादर करावा अथवा दुरूस्ती नसल्यास सदरचे प्रपत्र स्वाक्षरी करून विभागीय मंडळाकडे जमा करून घ्यावे.

४. प्रत्येक बॅक व ब्रॅचमध्ये नोटीस बोर्डवर डकविण्यासाठी परिपत्रक तयार करण्यात आले असुन ते सोबत जोडले आहे.

५. सर्व विभागीय मंडळांनी आपला एक प्रतिनिधी त्यांच्या कक्षेतील सर्व बॅकाना हयातीच्या दाखल्या संदर्भातील कार्यवाहीचे पत्र, यादी व एक कोरी फाईल देण्यासाठी आणि बॅकेतील नोटीस बोर्डवर परिपत्रक डकविण्यासाठी पाठवावा.

६. हयातीच्या दाखल्यांची यादी व त्यासोबतचे परिशिष्ट अ,ब व क दिनांक ०१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत बॅकेत ठेवण्यात यावी. त्यानंतर दोन्ही याद्या, हयातीचे दाखले व परिशिष्ट अ, ब व क बॅकेतुन प्राप्त करून घेवून मुळ स्वाक्षरीची यादी व हयातीच्या दाखल्याची व त्यासोबतच्या परिशिष्टांची मुळ प्रत पुढील कार्यवाहीसाठी ०५ डिसेंबर, २०२५ पर्यंत राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत.




Scanned with OKEN Scanner

७. मुद्दा क्र. ६. नुसार राज्यमंडळाकडे सादर केलेल्या दस्ताऐवजांची एक प्रत विभागीय मंडळामध्ये जतन करून ठेवावी.

८. मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या वेबसाईटवर हयात दाखले प्रसिध्द करण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार दिनांक ३० नोव्हेंबर,२०२५ पर्यंत हयातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. तथापि, काही कारणास्तव हयातीचा दाखला द्यावयाचा राहील्यास अश्या निवृत्तीवेतनधारकांनी सदरची प्रिंट काढून दाखला परिपूर्ण भरून त्यावर राजपत्रित अधिकारी किंवा बॅक अधिकारी यांची स्वाक्षरी पदनाम शिक्क्यासह घेवुन विभागीय मंडळ कार्यालयात दिनांक ०५ डिसेंबर,२०२५ पर्यंत सादर करणे अनिवार्य असुन तद्नंतर प्राप्त होणाऱ्या हयात दाखल्यांचा विचार केला जाणार नाही.

९. परिपत्रकाची एक प्रत विभागीय मंडळामध्ये देखील सर्वांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने नोटीस बोर्डवर डकविण्यात यावी.

१०. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करतांना सबंधित सेवानिवृत्ती/कुटुंबनिवृत्ती धारकांचे हयात दाखला व त्यासोबतच्या परिशिष्टांमधील सर्व बाबी जसे जन्म तारिख, सेवानिवृत्ती दिनांक, हयात दिनांक, मोबाईल नंबर, ई–मेल आय. डी., पॅन नंबर, आधार नंबर, पत्र व्यवहारासाठीचा पत्ता, सेवानिवृत्त व कुटूंबनिवृत्ती वेतनधारकांची स्वाक्षरी, राजपत्रित अधिकारी/बॅक अधिकारी यांची स्वाक्षरी व शिक्का इ. सर्व बाबींची तपासणी जरी सबंधित सेवानिवृत्तीधारक/कुटुंबनिवृत्तीधारक यांचेकडून केलेली असेल तरी विभागीय मंडळाने सदर नोंदी व त्यासंदर्भातील दुरूस्त्या त्यांनी सादर केलेल्या आधारकार्ड, पॅनकार्ड व इतर कागदपत्रावरून पडताळणी करण्याची जबाबदारी विभागीय मंडळाची असेल याची नोंद घ्यावी व त्रुटीविरहीत माहिती राज्यमंडळाकडे सादर केल्या जातील याची दक्षता घ्यावी.

वरिलप्रमाणे हयात दाखल्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या परिपत्रकाप्रमाणे सर्व विभागीय मंडळाने आवश्यक ती कार्यवाही करून मागणी केलेली सर्व माहिती व कागदपत्रे विहीत कालावधीमध्ये राज्यमंडळ कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही करावी.

Digitally signed by
Devidas Balkrishna Kulal
Date: 17-10-2025
15:51:45

(देविदास कुलाळ)

**सचिव,**

राज्य मंडळ, पुणे–०४

सोबत :– वरिलप्रमाणे



ile No. MSBSHS-15018/18/2025-PNM (Computer No. 2324148)

Scanned with OKEN Scanner

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्रराज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ, स.नं.८३२अे, फायनल प्लॉट नं.१७८,१७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयुटच्यामागे,भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे—४११ ००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 & EPABX -25705000 &
Email : secretary.stateboard@gmail.com

# परिपत्रक

**परिपत्रक क्रमांकः—रा.मं./पेन्शन/हयातीचे दाखले/२०२५—२६/ ३६७७, दिनांकः— ३१/१०/२०२५**

**संदर्भ :—** १. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:निवेयो—१००७/प्र.क्र.१२०/कोषाप्र.५/मुंबई ३२, दिनांक १८ ऑगस्ट, २००८

२. वित विभाग, शासन परिपत्रक क. संकिर्ण—२०२१/प्र.क्र.९९/२१/कोषा—प्रशा—५/मुंबई ३२, दिनांक २२ डिसेंबर,२०२१

राज्यमंडळासह सर्व विभागीय मंडळातुन सेवानिवृत्त झालेले सेवानिवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांना कळविण्यात येते की, सन २०२५—२६ करीता हयातीचे दाखले सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. सेवानिवृत्त व कुटुंबनिवृत्ती वेतनधारकांची सविस्तर माहिती असलेली विभागीय मंडळ निहाय, प्रत्येक बॅक व ब्रॅचनिहाय दोन याद्या मंडळाकडे उपलब्ध असलेल्या व मागील वर्षी घेण्यात आलेल्या प्रपत्रातील नमूद माहितीच्या आधारे तयार करण्यात आल्या असुन निवृत्तीवेतन घेत असलेल्या बॅकेमध्ये व ती बॅक ज्या विभागीय मंडळाच्या क्षेत्रामध्ये येत आहे त्या विभागीय मंडळामध्ये ठेवण्यात येत आहे.

२. हयातीचे दाखले व परिशिष्ट अ व ब चे कोरे फॉर्म विभागीय मंडळामध्ये ठेवण्यात येत आहे. तसेच मंडळाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात येत आहे..

३. प्रत्येक सेवानिवृत्तीधारक/कुटुंबनिवृत्तीधारक यांची राज्य मंडळ कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहीती परिशिष्ट क मध्ये घेण्यात आलेली असुन ते प्रपत्र निवृत्तीवेतन घेत असलेल्या बॅकेमध्ये व विभागीय मंडळामध्ये ठेवण्यात येत आहे.

४. परिशिष्ट क मध्ये काही दुरूस्त्या असतील तर ती दुरूस्ती करून स्वतंत्र विनंती अर्जासह योग्य त्या पुराव्यासह विभागीय मंडळाकडे सादर करावा अथवा दुरूस्ती नसल्यास सदरचे प्रपत्र स्वाक्षरी करून विभागीय मंडळाकडे जमा करावे.

५. हयातीच्या दाखल्यांची यादी व त्यासोबतचे परिशिष्ट अ,ब व क दिनांक ०१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर,२०२५ पर्यंत बॅकेत ठेवण्यात येत आहे व हयातीच्या दाखल्याची व त्यासोबतच्या परिशिष्टांची मुळ प्रत ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत विभागीय मंडळाकडे सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा हयातीचा दाखला मुदतीमध्ये प्राप्त न झाल्यास अथवा अपूर्ण स्वरूपात असल्यास डिसेंबर महिन्यापासून (December paid in january) निवृत्तीवेतन/कुटुंबनिवृत्तीवेतन तातुपरते स्थगित करण्यात येईल.

६. सर्व सेवानिवृत्तीधारक व कुटुंबनिवृत्तीधारक यांना सुचित करण्यात येते की, राज्यमंडळाने तयार केलेल्या नमुन्यातच हयातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही प्रपत्र, दाखले, जुने नमुने सादर केले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

७. हयात दाखल्याबाबत आपणास काही अडचण किंवा शंका असल्यास राज्यमंडळ, लेखा/पेन्शन शाखा, पुणे—०४ यांचेशी संपर्क साधावा. संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक ०२०—२५७०५००० किंवा ०२०—२५७०५१३२

वरीलप्रमाणे सन २०२५—२६ करीता हयातीच्या दाखल्याबाबत कार्यवाही करावी. तसेच हयातीच्या दाखल्यासोबत आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.

Digitally signed by Devidas Balkrishna Kulal
Date: 17-10-2025 15:50:31

(देविदास कुलाल)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे—०४

प्रत माहितीस्तव :—

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.



File No. MSBSHS-15018/18/2025-PNM (Computer No. 2324148)
Generated from eOffice by KALPANA RAJENDRA KHARASE , SRCLPEN, SENIOR CLERK , MSBSHSE-PUNE on 24/10/2025 11:31 am

Scanned with OKEN Scanner

# हयातीचा दाखला

दिनांक :–

| EP- |
|---|

अ. सेवानिवृत्तीवेतनधारक क्रमांक :–

मी श्री./श्रीमती (संपूर्ण नाव) ..................................................महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, ........................................ मंडळ, .......................येथील नियत वयोमानाने/स्वेच्छेने सेवानिवृत्त मंडळ अधिकारी/कर्मचारी आहे. मी दिनांक ..........................रोजी सेवानिवृत्त झालो/झाले आहे.

मी यादवारे घोषित करतो/करते की, माझी जन्मतारीख ........................................ असून, आज दिनांक .......................रोजी मी हयात आहे.

................................

(सेवानिवृत्त वेतनधारकाची स्वाक्षरी)

---

ब. कुटुंब निवृत्तीवेतनधारक क्रमांक :–

| FP- |
|---|

मी श्री./श्रीमती (संपूर्ण नाव) ..................................................महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, ............................ मंडळ, ...................... येथील कुटुंबनिवृत्तीवेतनधारक आहे. माझे पती/माझी पत्नी श्री./श्रीमती .............................................हे/हया ................................ ..................................येथील मंडळ अधिकारी/कर्मचारी/सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी होते.

मी यादवारे घोषित करतो/करते की, माझी जन्मतारीख .......................... असून, आज दिनांक . .......................... रोजी मी हयात आहे.

तसेच यासोबत परिशिष्ट 'अ' (पुनर्विवाहबाबत) व परिशिष्ट 'ब' (नियुक्ती व पुनर्नियुक्तीबाबत) जोडलेला आहे.

................................

(कुटुंब निवृत्तवेतनधारकाची स्वाक्षरी)

( लागु नसेल ते खोडावे )

---

भ्रमणध्वनी क्रमांक:– ——————————घरचा दूरध्वनी क्रमांक क्रमांक :– ——————————

आधार कार्ड नंबर :– —————————————— पॅन कार्ड नंबर :– ——————————

घरचा पत्ता :– ——————————————————————————————

बॅंकेचा नांव व पत्ता :– ——————————————————————————

खाते क्रमांक :– ————————————आय.एफ.एस.सी कोड :– ——————————

(आधार कार्ड,पॅनकार्ड व बॅंक पासबुकची छायाप्रत जोडण्यात यावी.)

---

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त सेवा निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारक हे आज दिनांक ................................. रोजी हयात आहेत व त्यांनी माझ्या समक्ष सही/अंगठा केलेला आहे. सदर दाखला अर्जदाराच्या मागणीनुसार देण्यात येत आहे.

................................................

(राजपत्रित अधिकारी/बॅंक अधिकारी यांची स्वाक्षरी)

पदनाम व शिक्क्यासह



Scanned with OKEN Scanner

१. अधिसूचना, वित्त विभाग कमांक :–सेनिवे २०१४/प्र.क्र.१०६/सेवा–४,दिनांक ११ जून,२०१५
२. वित्त विभाग, शासन निर्णय कमांक :– सेनिवे २०१४/प्र.क्र.१०६/सेवा–४,दिनांक ०७ फेब्रुवारी,२०१८
३. वित्त विभाग, शासन शुध्दीपत्रक कमांक :सेनिवे–२०१४/प्र.क्र.१०६/सेवा–४,दिनांक १६ सप्टेंबर,२०१९

## परिशिष्ट अ

## पुनर्विवाह न केल्याबाबतचा दाखला

( फक्त पुरूष कुटुंब निवृत्तीवेतन धारकांसाठी )

कुटुंब निवृत्तीवेतनधारक क्र. FP–

मी श्री (पूर्ण नाव) ............................................................ यादवारे असे घोषित करतो की, माझी पत्नी कै. श्रीमती ................................................................................ ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, ............................................................................ मंडळ येथिल कर्मचारी होती. मी मंडळाचा कुटुंब निवृत्तीवेतनधारक आहे.

मी आज दिनांक ................................ रोजी पुनर्विवाह केला आहे/नाही.

असल्यास पुनर्विवाहाचा दिनांक .............................

दिनांक :–

स्थळ :–

...........................................

( कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांची स्वाक्षरी )

---

## परिशिष्ट ब

## कुटुंब निवृत्तीवेतनधारक नियुक्ती व पुनर्नियुक्तीबाबतचा दाखला

मी श्री/श्रीमती ................................................ यादवारे असे घोषित करतो/करते की, राज्य शासन/केंद्र शासन/स्वायत्त संस्था/खाजगी अनुदानित संस्था/विभागीय मंडळामध्ये नियुक्ती /पुनर्नियुक्तीवर कोठेही नोकरीत/सेवेत आहे/नाही.

नोकरीत/सेवेत असल्यास खालीलप्रमाणे माहिती देत आहे. ( स्पष्ट खुलासा करावा )

सदर कार्यालयाचे नाव व पत्ता :– ..........................................................................

पदनाम :– ..........................................................................

पुनर्नियुक्तीचा दिनांक :– ..........................................................................

दिनांक :–

स्थळ :–

...........................................

( कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांची स्वाक्षरी )



Scanned with OKEN Scanner

परिशिष्ट क

# Details of Pensioners for Life Certificate

Pension No :-

## A Pensioner Details

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Name | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 2 | Name in Marathi | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 3 | Gender | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 4 | Date Of Birth | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 5 | Date Of Pension Start | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 6 | Mobile No. | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 7 | Email ID | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 8 | UID.No | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 9 | PAN.No | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |
| 10 | Board/Divisional Board as per the address where the pensioner resides. | :- | |
| | If there is a correction, it should be recorded in this cell | :- | |

## B Permanent Residence Address

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Building No. | :- | |
| 2 | Locality | :- | |
| 3 | Town/City | :- | |
| 4 | District | :- | |
| 5 | State | :- | |
| 6 | Pin Code | :- | |

## C Temporary Residence Address

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Building No. | :- | |
| 2 | Locality | :- | |
| 3 | Town/City | :- | |
| 4 | District | :- | |
| 5 | State | :- | |
| 6 | Pin Code | :- | |

## D Pension Joint Account / Singal Details

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Bank Name | :- | |
| 2 | Branch Name | :- | |
| 3 | IFSC Code | :- | |
| 4 | Bank Address | :- | |
| 5 | Account No. | :- | |
| 6 | MICR Code No. | :- | |

## E Documents required for life certificate please submit xerox copy and original life certificate to office.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Pan Card | 2 copies | 2 | Adhar Card | 2 copies |
| 3 | Pension A/c Passbook frist page / Cancelled Cheque | 2 copies | 4 | Copy of Life Certificate sent to pensioners | 1 copy |

Signature of Pensioner

१. पार्ट A मध्ये काही दुरुस्त्या असतील तर त्या दुरुस्त्या त्याखालील रकान्यामध्ये लाल पेनाने लिहाव्यात.
२. पार्ट B किंवा C मध्ये काही दुरुस्त्या असतील तर त्या संदर्भात स्वतंत्र विंनती अर्जासह योग्य तो पत्याचा पुरावा सोबत जोडावा.
३. पार्ट D मध्ये काही दुरुस्त्या असतील तर त्या संदर्भात स्वतंत्र विंनती अर्जासह योग्य तो पुरावा सोबत जोडावा.

Scanned with OKEN Scanner